महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे,

# महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय,उदगीर

(स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड संलग्न)

नॅक मानांकन A+ दर्जा




## वरिष्ठ महाविद्यालय

## माहिती पुस्तिका २०२६-२७

फोन नं. कार्यालय - ०२३८५-२९५५५२

प्राचार्य - ०२३८५-२९५५४५

pmucu16@yahoo.co.in www.mumu.edu.in

**सुसज्ज ग्रंथालय**



**मुलींचे वसतिगृह**




**सुसज्ज प्रयोगशाळा**





# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| ०१. प्राचार्यांचे मनोगत | ०१ |
| ०२. महाविद्यालयाची वैशिष्ट्ये | ०३ |
| ०३. पदवी विभाग | ०४ |
| ०४. पदव्युत्तर विभाग | ०७ |
| ०५. प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे व नियमावली | ०८ |
| ०६. महाविद्यालयातील संशोधन सुविधा | ०९ |
| ०७. फी संबंधी विवरण | १० |
| ०८. शिष्यवृत्ती संबंधी माहिती | १३ |
| ०९. विद्यार्थ्यांसाठी नियम व अटी | १५ |
| १०. विद्यार्थ्यांसाठी राबविले जाणारे उपक्रम | १७ |
| ११. मान्यवरांकडून दिली जाणारी पारितोषिके | २१ |
| १२. महाविद्यालयातील विभाग व प्राध्यापक वृंद | २२ |
| १३. कार्यालयीन कर्मचारी | २३ |
| १४. कार्यकारिणी | २५ |



# प्राचार्यांचे मनोगत...

भविष्यातील सुखी जीवनाचे मंत्र शिकावेत म्हणून आमच्या महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या गुणी विद्यार्थ्यांनो व पाल्यांना प्रेरणा देणाऱ्या पालकांनो आपणास सप्रेम नमस्कार ! महाविद्यालयात आपले मनोभावे स्वागत..नूतन शैक्षणिक वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !

म. ए. सोसायटीच्या ध्येयवेड्या व दृष्टी असलेल्या संस्थाचालकांनी उदगीर व परिसरातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची सोय उपलब्ध करून दिली. सर्वांनी शिकावे, शहाणे व्हावे आणि समाज व राष्ट्रसेवेसाठी तरुण-तरुणींनी बाहेर पडावे, हाच आदरणीय संस्थाचालकांचा निर्भेळ उद्देश होता व आहे. आजच्या संस्थाचालकांनीही बांधिलकीचे भान ठेवून मूल्यांशी तडजोड न करता तेजस्वी आणि तपस्वी रत्ने महाविद्यालयातून घडविण्यावर लक्ष ठेवले; त्याच करिता प्राचार्य आणि सर्व कर्मचाऱ्यांना ते सदोदित प्रेरणा देत आहेत. जगाची दिशा ओळखून परिवर्तनाची महन्मंगल बीजसूत्रे विद्यार्थ्यांच्या मनोभूमीत महाविद्यालयातील प्राध्यापकांनी पेरावीत याकडे संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी जाणिवेने लक्ष दिले व देत राहतील.

केवळ मार्कवान विद्यार्थी नव्हे तर गुणवान विद्यार्थी घडविणे त्याच ध्यासाने महाविद्यालय आपली सेवा समाज व देशाच्या चरणी रुजू घालीत आहे.आम्हा सर्वांच्या प्रयत्नाने आमचा विद्यार्थी आपल्या देशात आणि परदेशातील विविध क्षेत्रावर आपल्या कर्तत्वाची अपूर्व नाममुद्रा कोरली आहे. आमच्या वत्सल, विवेकी, विचक्षण व नवसृजनाची ओढ असलेल्या गोड विद्यार्थ्यांनी पादाक्रांत केलेली यशोशिखर आपणास सर करून नवा इतिहास घडविण्यासाठी साद घालीत आहेत. स्वतःला ओळखा, विचार करा, संकल्प करून निर्भयतेने सिध्दीप्रत पोहोचेपर्यंत थांबू नका, तुमच्या स्वप्नाचे तुम्ही नक्कीच शिल्पकार व्हाल !

विद्यार्थी मित्रांनो, यशाचा ध्यास घ्यावयास लावणारे प्रेमळ व प्रबुध्द प्राध्यापक ही महाविद्यालयाची मौलिक संपत्ती आहे; अशा ज्ञानवंत आचार्यांकडून आपल्यात ज्ञानाची लालसा निर्माण केली जाईल. विचार करायला निगुतीने प्रवृत्त केले जाईल. आमचा विद्यार्थी ज्ञानपिपासू व्हावा. विचारपरिस्कृत व कृतीवंत व्हावा, ही आमच्या शिक्षक बांधवांची मनीषा आहे. अरुपाला रुप द्यावे. निराकाराला आकार द्यावा. नव्या शैक्षणिक धोरणाने लागणाऱ्या झळा व येणाऱ्या कळांनी आपल्या  कर्तृत्वाची बाग करपून जाऊ नये म्हणून महाविद्यालयातील शिक्षकवृंद कर्तव्यबुध्दीने विद्यार्थ्यांच्या यशाचा मळा फुलविण्यासाठी अविरत प्रयत्न करीत असतो. नव्या शैक्षणिक धोरणानुसार विषयाची निवड, अभ्यासक्रम, परीक्षा आणि आपणास सतावणाऱ्या प्रश्नांची उत्तरे देणारे गुरू आपल्या मदतीसाठी तत्पर असतात.

मित्रांनो, तुमच्या जीवनात चैतन्याची युगवात लावली जाईल. उत्थानाचे चक्र फिरवीत, क्रांतीचा मंत्रघोष, मानवतेचा बिगुल वाजविण्याची शक्ती नि युक्ती आपणास शिकायला मिळेल. साहसाचे पंख लाभतील. शब्दांचे सूर्यसोहळे प्रत्ययाला येतील. संवेदना मृत झालेल्या माणसांच्या कळपात तुम्ही गुदमरणार नाही, याची दक्षता घेतली जाते. पाठ्यक्रमासोबतच सुंदर जगण्याचे पाठ प्रभावीपणे शिकविले जातात. आपल्यातल्या सुप्त कलागुणांचा शोध

घेवून त्यांना आकार दिला जातो. वर्गात चैतन्याची सळसळ अनुभवाल तर ग्रंथालयात वैविध्यपूर्ण ग्रंथाची मांदियाळी तुमचे मन व मेंदू संस्कारक्षम करेल. मैदानावर तुमच्या मनगटाला मजबूत केले जाते. महाविद्यालयातील वॉकिंग ट्रॅक, इनडोअर स्टेडियम, जिम व मनमोहक निर्सगरम्य परिसर आपल्याला अध्ययनासाठी आनंदी ठेवेल. ग्रंथालय तुम्हाला आत्मानंद देईल. दुर्मिळ वनस्पती जी पुत्रवत पोसली, वाढवली व विविध संकटांशी सामना करीत सांभाळली आहे. कदाचित मराठवाड्यातील हे महत्वपूर्ण औषधी वनस्पतीचे उद्यान असू शकेल असे वाटते.

महाविद्यालयाच्या एकूणच प्रगतीमुळे नॅकच्या तिसऱ्या टप्प्यात A+ हा दर्जा प्राप्त झाला. पारंपारिक अभ्यास-क्रमाबरोबर पोलीस भरती, ग्रामसेवक, तलाठी, रेल्वे इ. विभागातील पदांच्या भरतीकरिता घेतल्या जाणाऱ्या स्पर्धा परीक्षेचे वर्ग महाविद्यालयात सुरु केले जाणार आहेत. संगणकासोबत संस्काराचे, नेतृत्वाबरोबर नीतिचे, वक्तृत्वाबरोबर विवेकाचे धडे देत विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हाच आमचा संकल्प; मात्र त्यासाठी हवी आपली साथ, जिद्द व सकारात्मक दृष्टी. हे सर्व एकजीव झाले तर आपल्या आयुष्यात विकासाची सृष्टी अवतरेल. महाविद्यालयात सर्व विद्यार्थी, विद्यार्थिनी, प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी यांना नूतन शैक्षणिक वर्षाकरिता मनोभावे शुभेच्छा.

**डॉ. आर. के. मस्के**
**प्राचार्य**

# महाविद्यालयाची ठळक वैशिष्ट्ये

- उच्चविद्याविभूषित, आपापल्या विषयांत पारंगत, अनुभवी, कार्यक्षम व विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी तत्पर प्राध्यापकवृंद
- विविध विषयांवरील ग्रंथ, वृत्तपत्रे, नियतकालिके, पाक्षिके, इत्यादी वाचन साहित्य, विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी वेगळी बैठक व्यवस्था असलेली अभ्यासिका इंटरनेटची सुविधा व समृद्ध ग्रंथालय
- आधुनिक उपकरणांसह शिक्षण, Digital Classroom व संशोधनासाठी सुसज्ज प्रयोगशाळा
- स्पर्धा परीक्षा व नेट / सेट तयारीसाठी खास प्रशिक्षण वर्ग
- अद्ययावत संगणकशास्त्र विभाग
- बारा विषयांत पदव्युत्तर अभ्यासक्रम
- एकोणीस विषयांमध्ये संशोधनाची सोय
- अनेक व्यवसायाभिमुख अभ्यासक्रम
- शहराच्या गर्दी - गोंगाटापासून दूर असलेला प्रदूषण मुक्त सुंदर परिसर
- आधुनिक क्रीडा साहित्यासह वॉकिंग ट्रॅक, बास्केटबॉल कोर्ट व भव्य क्रीडांगण तसेच विविध क्रीडा प्रकारांचे मार्गदर्शन देणारा अत्याधुनिक क्रीडा विभाग
- निरोगी शरीरासाठी व सौष्ठवतेकरिता विद्यार्थी आणि विद्यार्थिनीसाठी स्वतंत्र 'व्यायामशाळा' (जिम)
- बॅडमिंटन, टेबल टेनिस व इतर खेळांसाठी बंदिस्त क्रीडागृह (Indoor Stadium)
- दुर्मीळ व नामशेष होत असलेल्या वनस्पतींच्या प्रजातींसह सुंदर असे 'वनस्पतीचे उद्यान'
- विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी माफक दरात स्वतंत्र वसतिगृहाची सुविधा
- विशेष दिनानिमित्त मान्यवर वक्त्यांची भाषणे, वक्तृत्व स्पर्धा व इतर कार्यक्रमांचे आयोजन
- विद्यार्थ्यांमध्ये स्वयंशिस्त व देशभक्ती निर्माण करून सैन्य भरतीसाठी सदैव प्रयत्नशील असणारा राष्ट्रीय छात्र सेना (NCC) व राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभाग
- NAMP केंद्रशासनाच्या योजनेअंतर्गत महाराष्ट्र शासनाच्या मार्फत चालणाऱ्या कार्यक्रमानुसार उदगीर शहरातील हवेची गुणवत्ता तपासणी
- SWAYAM व MKCL चे Online Courses कृत्रिम बुद्धीमत्ता (AI)

## पदवी विभाग

## बी. ए. (Bachelor of Arts)

### प्रथम वर्ष :

1. Ability Enhancement Course L 1 : English
2. Ability Enhancement Course L 2 (SL) : मराठी / हिंदी / इंग्रजी / उर्दू / कन्नड

**३.ऐच्छिक विषय :** गट १ : मराठी / हिंदी / इंग्रजी / उर्दू / कन्नड
गट २ : अर्थशास्त्र / लोकप्रशासन
गट ३ : इतिहास/ समाजशास्त्र
गट ४ : राज्यशास्त्र/ भूगोल / गणित / संगीत (शासन मान्यतेच्या अधिन राहून)

(वरील ऐच्छिक गटांपैकी कोणत्याही तीन गटांतून प्रत्येकी एक विषय निवडावा.)

4. Generic Elective (From Other Faculties) (वाणिज्य किंवा विज्ञान शाखेतील एक विषय निवडावा)
5. Vocational and Skill Enhancement Course
6. **Sem. - I** Indian Knowledge System; **Sem. - II** Constititution of India

### द्वितीय वर्ष :

1. Ability Enhancement Course L 1 : English
2. Ability Enhancement Course L 2 (SL) : मराठी / हिंदी / इंग्रजी / उर्दू / कन्नड
3. a. Major प्रथम वर्षात अभ्यासलेल्या ३ ऐच्छिक विषयांपैकी १ विषय निवडावा
   b. Minor प्रथम वर्षात अभ्यासलेल्या ३ ऐच्छिक विषयांपैकी मेजर विषय सोडून १ विषय निवडावा
4. Generic Elective (From Other Faculties) (वाणिज्य किंवा विज्ञान शाखेतील एक विषय निवडावा)
5. Vocational and Skill Enhancement Course (मेजर विषयाशी संबंधित)
6. **Co-Curricular Courses** (NSS/NCC/Sports/Culture/Health Wellness/Fitness/Yoga Edu) (3rd Sem.)
7. Environmental Studies (4th Sem)

**तृतीय वर्ष :** As per NEP 2020 - विद्यापीठाच्या संभाव्य परिपत्रकानुसार

**पदवी स्तरावर (B.A.,B.Sc.,B.Com,B.Sc.C.S.)**
**कोणत्याही एका वर्षात सायबर सेक्युरिटी कोर्स**
**प्रति सत्र (Semester) दोन श्रेयांक या प्रमाणे**
**१ वर्षात ४ श्रेयांकासाठी पूर्ण करणे अनिवार्य आहे.**

## B. Sc. (Bachelor of Science)

### First Year :

1. Ability Enhancement Course L 1 : English
2. Ability Enhancement Course L 2 (SL) : Marathi/Hindi/English/Urdu/Kannada/Sanskrit
3. Optionals : Group 1 : Physics / Botany
   Group 2 : Mathematics / Zoology
   Group 3 : Chemistry
   Group 4 : Computer Science
   Group 5 : Electronics/Microbiology/Dairy Science/Environmental Science
   (Select any three optionals choosing one from any three groups)
4. Generic Elective (From other Faculties) (वाणिज्य किंवा कला शाखेतील एक विषय निवडावा)
5. Vocational and Skill Enhancement Course
6. Sem. - I
   Indian Knowledge System

   Sem. - II
   Constititution of India

### Second Year :

1. Ability Enhancement Course L 1 : English
2. Ability Enhancement Course L 2 (SL) : Marathi/Hindi/English/Urdu/Kannada/Sanskrit
3. a. Major प्रथम वर्षात अभ्यासलेल्या ३ ऐच्छिक विषयांपैकी १ विषय निवडावा
   b. Minor प्रथम वर्षात अभ्यासलेल्या ३ ऐच्छिक विषयांपैकी मेजर विषय सोडून १ विषय निवडावा
4. Generic Elective (From Other Faculties) (वाणिज्य किंवा कला शाखेतील एक विषय निवडावा)
5. Vocational and Skill Enhancement Course (मेजर विषयाशी संबंधित)
6. **Co-Curricular Courses** (NSS/NCC/Sports/Culture/Health Wellness/Fitness/Yoga Edu) (3rd Sem.)

**Third Year :** As per NEP 2020 - विद्यापीठाच्या संभाव्य परिपत्रकानुसार

## B. Com. (Bachelor of Commerce)

### First Year

**Semester - I**

1. Ability Enhancement Course L 1 : English
2. Ability Enhancement Course L 2 (SL) :
   Marathi / Hindi / English / Urdu /
   Kannada / Sanskrit
3. Optionals
   i. Financial Accounting - I (DSE Major)
   ii. Business Economics - I (DSE Major)
   iii. Business Statistics (DSM Minor)

**Semester - II**

1. Ability Enhancement Course L 1 : English
2. Ability Enhancement Course L 2 (SL) :
   Marathi /Hindi /English/Urdu/Kannada/
   Sanskrit /
3. Optionals
   i. Financial Accounting - II (DSE Major)
   ii. Business Economics - II (DSE Major)
   iii. Business Statistics and Mathematics

4. Generic Elective (From Other Faculties) (विज्ञान किंवा कला शाखेतील एक विषय निवडावा)
5. Skill Enhancement Course
6. Sem. - I
   Indian Knowledge System

   Sem.- II
   Constititution of India

## Second Year

### Sem. - III

**01. Discipline Specific Core (DSC) Major**
Corporate Accounting - I

**02. Discipline Specific Core (DSC) Major**
Cost Accounting - I

**Discipline Specific Minor (DSM) (Any One)**
Direct Taxes Law & Practice - I
Business Management - I
Business Enterpreneurship - I

**General Elective - I**
**(Only student of other Discipline can opt any one)**
Financial Literacy - I
Tourism Marketing - I
Principles of Advertising & Salesmanship - I

**Vocational & Skill Course - (VSC)**
**Relating to Major (Any one)**
Business Communication Skills - I
GST Procedure & Practice - I
Stock Market - I
Banking & Insurance - I
UGC - Vocational Courses (For Approved Colleges)
SWAYAM/ NPTEL

**Ability Enhancement Course (AEC)-ENG**
Compulsory English

**Ability Enhancement Course (AEC) MIL**
Modern Indian Language (MIL) OR
UGC- Vocational Courses (For Approved Colleges)

**Co-Curricular Courses**
(NSS/NCC/Sports/Culture/
Health Wellness/Fitness/Yoga Edu)

### Sem. - IV

**01. Discipline Specific Core (DSC) Major**
Corporate Accounting - II

**02. Discipline Specific Core (DSC) Major**
Cost Accounting - II

**Discipline Specific Minor (DSM) (Any One)**
Direct Taxes Law & Practice - II
Business Management - II
Business Entrepreneurship - II

**General Elective - I (Only student of other Discipline can opt anyone)**
Financial Literacy - II
Tourism Marketing - II
Principles of Advertising & Salesmanship - II

**Vocational & Skill Course - (VSC)**
**Relating to Major (Any one)**
Business Communication Skills - II
GST Procedure & Practice - II
Stock Market - II
Banking & Insurance - II
UGC - Vocational Courses (For Approved Colleges)
SWAYAM/ NPTEL

**Ability Enhancement Course (AEC)-ENG**
Compulsory English

**Ability Enhancement Course (AEC) MIL**
Modern Indian Language (MIL) OR
UGC- Vocational Courses (For Approved Colleges)

**Value Education Courses (VEC)**
Environmental Studies

## Third Year

As per NEP 2020 - **विद्यापीठाच्या संभाव्य परिपत्रकानुसार**

# Faculty of Computer Science

## B. C. A. ( Bachelor of Computer Application)

**Eligibility :** 1. 12 th passed from any stream (Arts, Science or Commerce)
2. Ranking as per MAH-B BCA-CET Exam 2025

## B.Sc.C.S. ( Bachelor of Computer Science)

**Eligibility :** 12 th Science

## Career Oriented Courses

| Certificate Courses | Duration | Eligibility | Fee (in Rs.) |
|---|---|---|---|
| 1. Communication Skills (CS) | One Year | Students Studying in UG First Year | 500 |
| 2. Remote Sensing & Interpretation of Ariel Photographs & Satellite Imagery (RSIAPSI) | One Year | Students Studying in UG First Year | 500 |
| 3. Soil Quality Assessment (SQA) | One Year | Students Studying in UG First Year | 2000 |
| **पात्रता :** बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी., बी.एस्सी.सी.एस. व बी. सी. ए. प्रथम वर्षात शिकत असताना सोबतच वरील प्रमाणपत्र अभ्यासक्रमासही प्रवेश घेऊ शकतात. | | | |
| 4. Online Courses A) MKCL (iLike, Klic, MS-CIT) B) SWAYAM<br>5. Certificate Course in Artificial Intelligence (AI) | | | |

## P. G. Programmes पदव्युत्तर अभ्यासक्रम

| अभ्यासक्रम | प्रवेशक्षमता | अनुदानित/विनाअनुदानित |
|---|---|---|
| एम. ए. मराठी (M. A. Marathi) | 80 | अनुदानित |
| एम. ए. इंग्रजी (M. A. English) | 80 | अनुदानित |
| एम. ए. हिंदी (M. A. Hindi) | 80 | विनाअनुदानित |
| एम. ए. उर्दू (M. A. Urdu) | 80 | विनाअनुदानित |
| एम. ए. भूगोल (M. A. Geography) | 80 | विनाअनुदानित |
| एम. ए. अर्थशास्त्र (M. A. Economics) | 80 | विनाअनुदानित |
| एम. ए. इतिहास (M. A. History) | 80 | विनाअनुदानित |
| एम. ए. समाजशास्त्र (M. A. Sociology) | 80 | विनाअनुदानित |
| एम. एस्सी. रसायनशास्त्र (M. Sc. Chemistry) | 80 | विनाअनुदानित |
| एम. एस्सी. दुग्धशास्त्र (M. Sc. Dairy Science) | 30 | विनाअनुदानित |
| एम. एस्सी. कॉम्प्युटर मॅनेजमेंट (M. Sc. C. M.) | 30 | विनाअनुदानित |
| एम. कॉम. (M. Com.) | 30 | विनाअनुदानित |
| | 80 | |

पदव्युत्तर स्तरावर (M.A.,M.Sc.,M.Com) दोन वर्षापैकी एका वर्षात सायबर सेक्युरिटी कोर्स प्रति सत्र (Semester) दोन श्रेयांक या प्रमाणे १ वर्षात ४ श्रेयांकासाठी पूर्ण करणे अनिवार्य आहे.

### : Recognised Research Centres :

01. Marthi 2. Hindi 3. Urdu 4. Geography 5. Chemistry 6. Economics 7.English

# प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे व नियमावली

## अ. आवश्यक कागदपत्रे

१. प्रवेश फॉर्म (कार्यालयामध्ये उपलब्ध आहे.)
२. शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र (TC) - मूळ प्रत व दोन सत्यप्रती
३. गुणपत्रक - मूळ प्रत व दोन सत्यप्रती
४. विद्यापीठ पात्रता फॉर्म
५. ईबीसी मंजुरी क्रमांक (आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी)
६. जात प्रमाणपत्र (राखीव प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी)
७. शिष्यवृत्ती मंजुरी क्रमांक (शिष्यवृत्ती धारकांसाठी)
८. स्थलांतर प्रमाणपत्र (इतर विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांसाठी)
९. आधार कार्डची छायांकित प्रत

## ब. प्रवेशासाठी नियमावली :

- प्रवेश घेतल्यानंतर १५ दिवसांच्या आत विद्यार्थ्यांनी ईबीसी फॉर्म व उत्पन्न प्रमाणपत्र कार्यालयात जमा करावे.
- अपूर्ण प्रवेश फॉर्म असल्यास प्रवेश नाकारला जाईल.
- टीसीची द्वितीय प्रत (Duplicate) असल्यास प्रवेश दिला जाणार नाही.

### कार्यालयीन व ग्रंथालयीन वेळ :

**सोमवार ते शुक्रवार**
सकाळी १०:३० ते दुपारी ५:३०
**शनिवार**
सकाळी १०:३० ते दुपारी २:००
**मध्यांतर**
दुपारी २:०० ते दुपारी ३:००

### Library Collection

- Total Books : 146459
- Journals & Magazines : 36
- Cassettes,CDs/ DVDs : 266
- Bound Volumes : 1385
- Theses / Dissertations : 265
  (Under Institutional Repository)
- Newspapers : 20
  (Marathi, Hindi, English, Kannada and Urdu)

Library e-resources - Access through Library website

# महाविद्यालयातील संशोधन सुविधा

## Our College has recognised research guides for Ph.D.degree in the following Subjects

| Sr.No. | Subject | Research Guide |
|---|---|---|
| 01. | Marathi | Dr. R. K. Maske<br>Dr. D. R. Chiddarwar<br>Dr. B. R. Dahiphale |
| 02. | English | Dr. K. R. Gavane |
| 03. | Hindi | Dr. B. S. Bhuktare |
| 04. | Kannada | Dr. Ramesh Hanmanthappa |
| 05. | Geography | Dr. M. P. Manakari<br>Dr. A. U. Nagargoje<br>Dr. M. J. Kulkarni |
| 06. | Economics | Dr. E. D. Korpakwad<br>Dr. S. A. Mule |
| 07. | Chemistry | Dr. S. G. Patil<br>Dr. G. G. Mandawad<br>Dr. B. S. Hote |
| 08. | Environmental Science | Dr. J. M. Patwari<br>Dr. R. K. Narkhede |
| 09. | Botany | Dr. R. B. Allapure |
| 10. | Mathematics | Dr. B. D. Karande |
| 11. | Zoology | Dr. B. S. Kamble |
| 11. | Physics | Dr. V. P. Pawar<br>Dr. M. S. Khandekar<br>Dr. N. D. Vagshette |
| 13. | History | Dr. S. R. Somwanshi<br>Dr. M. G. Mahake |
| 14. | Public Administration | Dr. G. G. Jewalikar |
| 15. | Sociology | Dr. S. G. Ansari<br>Dr. S. V. Bhadrashette |
| 16. | Commerce | Dr. B. S. Hokarne<br>Dr. S. N. Ghongade |
| 17. | Political Science | Dr. R. P. Sabde |
| 18. | Library and Information Science | Dr. L. B. Pensalwar |

## फी संबंधी विवरण (Fee Structure)

| Sr. No. | PARTICULARS | U. G. Courses (Fee in Rs.) | P. G. Courses (Fee in Rs.) |
|---|---|---|---|
| 01 | Registration Fee | 20 | 30 |
| 02 | Laboratory Fee | 1500 | 1500 |
| 03 | Laboratory Fee (for B. A.) | 150 | 150 |
| 04 | Magazine Fee | 50 | 50 |
| 05 | Student Aid Fee | 10 | 10 |
| 06 | Sports Fee | 75 | 75 |
| 07 | Social Gathering Fee | 70 | 70 |
| 08 | Library Fee | 150 | 150 |
| 09 | Student Welfare Fee | 60 | 60 |
| 10 | College Development Fee | 75 | 75 |
| 11 | Identity Card Fee | 15 | 15 |
| 12 | Student Forum Fee (Council) | 20 | 20 |
| 13 | Home Exam Fee | 35 | 35 |
| 14 | Medical Examination Fee | 05 | 05 |
| 15 | University Sports Fee | 75 | 75 |
| 16 | Miscellaneous Fee (Other Fee) | 25 | 25 |
| 17 | Eligibility Fee | 100 | 100 |
| 18 | Book Bank | 10 | 10 |
| 19 | Youth Festival | 50 | 50 |
| 20 | Ashwamedh | 30 | 30 |
| 21 | Emergency Fee | 15 | 15 |
| 22 | Students Insurance Fee | 08 | 08 |
| 23 | Chancellor's Office Activities Fee | 32 | 32 |
| 24 | Zonal Sports Council Fee | 50 | 50 |
| 25 | Internet | 600 | 600 |
| 26 | Cyber Security Course | 700 | 700 |
| 27 | T.C.Fee | 50 | 50 |
| 28 | Gymkhana | 70 | 70 |

A) Tuition Fee for Granted Arts, Commerce & Science Courses :

1) UG = 1100/- 2) PG = 1320/-

B) Project Fee for UG & PG Rs.60/- (wherever applicable)

**नोट : वरील फी मध्ये विद्यापीठाकडून बदल झाल्यास ते लागू होतील.**

## UG ADMISSION FEE (in Rs.)

| Sr. No. | Year | B.A., B.Com | B.Sc. |
|---|---|---|---|
| 01 | FIRST YEAR | 1730+1100=2830 | 3080+1100=4180 |
| 02 | SECOND YEAR | 1730+1100=2830 | 3080+1100=4180 |
| 03 | THIRD YEAR | 1730+1100=2830 | 3080+1100=4180 |

- बी.ए.भूगोल विषय घेणाऱ्या विद्यार्थ्यांस प्रात्यक्षिक फी **150** रु.
- बी.ए.,बी.कॉम.,बी.एस्सी. तृतीय वर्ष पर्यावरण अभ्यास फी **150** रु.

## FEE (in Rs.) FOR NON-GRANTED COURSES (UG)

| Sr. No. | SUBJECT / COURSE | CLASS | ADMISSION FEE+ TUITION FEE | TOTAL |
|---|---|---|---|---|
| 01 | COMPUTER SCIENCE | B.Sc. (F.Y.) | 3080+4400 | 7480 |
| | | B.Sc. (S.Y.) | 3080+4400 | 7480 |
| | | B.Sc. (T.Y.) | 3080+4400 | 7480 |
| 02 | B.C.A. | FIRST YEAR | 3080+17600 | 20680 |
| | | SECOND YEAR | 3080+17600 | 20680 |
| | | THIRD YEAR | 3080+16000 | 19080 |
| 03 | B.Sc.C.S. | FIRST YEAR | 3080+17600 | 20680 |

बी.ए.,बी.कॉम.,बी.एस्सी. तृतीय वर्ष पर्यावरण अभ्यास फी १५० रु.

सर्व पदवी अभ्यासक्रमासाठी सायबर सेक्युरिटी कोर्स फी ७०० रु.

## FEE (in Rs.) FOR PG GRANTED COURSES

| Sr. No. | Scholarship Holder Student | M. A. ENGLISH/M. A. MARATHI Admission Fee+Tuition Fee (IN Rs.) |
|---|---|---|
| 01 | FIRST YEAR | 1740+1320= 3060 |
| 02 | SECOND YEAR | 1740+1320= 3060 |

**नोट : वरील फी मध्ये विद्यापीठाकडून बदल झाल्यास ते लागू होतील.**

# FEE (in Rs.) FOR PG NON-GRANTED COURSES

| Sr. No. | COURSE | SUBJECT | First Year | | Second Year | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | TUITION FEE+ ADMISSION FEE | Total | TUITION FEE+ ADMISSION FEE | Total |
| 01 | M.A. | Economics | 4400+1740 | 6140 | 4400+1740 | 6140 |
| | | History | 4400+1740 | 6140 | 4400+1740 | 6140 |
| | | Sociology | 4400+1740 | 6140 | 4400+1740 | 6140 |
| | | Geography | 4400+1740 | 6140 | 4400+1740 | 6140 |
| | | Urdu | 4400+1740 | 6140 | 4400+1740 | 6140 |
| | | Hindi | 4400+1740 | 6140 | 4400+1740 | 6140 |
| 02 | M.Sc. | Chemistry | 24200+3090 | 27290 | 24200+2990 | 27190 |
| | | Dairy Science | 18150+3090 | 21240 | 18150+2990 | 21140 |
| | | Computer Management | 24200+3090 | 27290 | 24200+2990 | 27190 |
| 03 | M.Com. | Commerce | 4400+1740 | 6140 | 4400+1740 | 6140 |

सर्व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी सायबर सेक्युरिटी कोर्स फी ७०० रु.

## करिअर कट्टा

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने करिअर कट्टा हा उपक्रम मागील दोन वर्षांपासून महाराष्ट्रातील युवकांसाठी कार्यरत आहे. विविध स्पर्धा परीक्षा व उद्योजकता विकासासाठी मार्गदर्शन करणे हा या मागील हेतू आहे. ग्रामीण व शहरी भागातील पदवी वर्गाच्या विद्यार्थ्यांना तज्ज्ञ प्रशिक्षकांचे मार्गदर्शन मिळावे यासाठी ***2 Credits*** चा एक कोर्स असे ५० कोर्सेस या उपक्रमाअंतर्गत विद्यार्थ्यांना दिले जातात. विद्यार्थ्यांना ३६५ रुपयांमध्ये ३ वर्षातील १००० दिवसांसाठी सभासद होता येईल. या कालावधीत ऑनलाईन पध्दतीने स्पर्धा परीक्षा व उद्योजकता विकास या विषयी मार्गदर्शन केले जाईल. रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या वतीने हा अभिनव उपक्रम राबविला जात आहे. याचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी विद्यापीठातील करिअर कट्टा प्रकल्प संचालकांशी संपर्क साधावा.

# शिष्यवृत्ती संबंधी माहिती

## राज्य सरकार शिष्यवृत्ती

खालील शिष्यवृत्तीची माहिती व अटी राज्य शासनाच्या https://mahadbtmahait.gov.in या संकेत स्थळावर पहावी.

### सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

१.भारत सरकार मॅट्रीकेत्तर शिष्यवृत्ती योजना   २.मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क
३.अपंग शिष्यवृत्ती (सर्व प्रवर्गातील अपंग विद्यार्थ्यांकरिता)

नोट : १७ मार्च २०२२ च्या शासन निर्णयानुसार अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांची शिक्षण फी व इतर फी च्या एकुण रकमेपैकी एक हप्ता महाविद्यालयात प्राप्त होणार आहे व एक हप्ता विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर जमा होणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी उर्वरित शुल्क स्वतः महाविद्यालयात जमा करावे लागेल.

### आदिवासी विकास विभाग

१.भारत सरकार मॅट्रीकेत्तर शिष्यवृत्ती
२.अनुसूचित जमाती विद्यार्थ्यांसाठी शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क

### विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष प्रवर्ग कल्याण विभाग

१.विमुक्त जाती व भटक्या जमाती विद्यार्थ्यांसाठी भारत सरकार मॅट्रीकेत्तर शिष्यवृत्ती योजना
२.विमुक्त जाती व भटक्या जमाती विद्यार्थ्यांसाठी शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क
३.इतर मागासवर्ग विद्यार्थ्यांसाठी भारत सरकार मॅट्रीकेत्तर शिष्यवृत्ती योजना
४.इतर मागासवर्ग विद्यार्थ्यांसाठी शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क
५.विशेष प्रवर्ग विद्यार्थ्यांसाठी भारत सरकार मॅट्रीकेत्तर शिष्यवृत्ती योजना
६.विशेष प्रवर्ग विद्यार्थ्यांसाठी शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क

### उच्च शिक्षण संचालनालय विभाग (खुला) कोणतीही एक योजना

१.गुणवंत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती - वरिष्ठ स्तर
२.डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना
३.स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना आर्थिक सहाय्य
४.माजी सैनिक पाल्यांना आर्थिक सहाय्य
५.राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना
६.गणित व भौतिकशास्त्र विषयातील गुणवंत / प्रज्ञावंत विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती

### अल्पसंख्यांक विकास विभाग

१.राज्य शासनाची अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती

## केंद्र सरकार शिष्यवृत्ती

पुढील शिष्यवृत्तीची माहिती व अटी केंद्र शासनाच्या https://scholarship.gov.in.या संकेतस्थळावर पाहावे.

# अल्पसंख्यांक विकास विभाग

## १. केंद्र शासनाची अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती

**उच्च शिक्षण संचालनालय विभाग** (कोणतीही एक)

१.सेंट्रल गव्हर्नमेंट अपंग शिष्यवृत्ती (सर्व प्रवर्गातील अपंग विद्यार्थ्यांकरिता)

२.सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती (www.dhepune.gov.in. या संकेतस्थळावर केंद्र शासनाने प्रसिद्ध केलेल्या पात्रता यादीमध्ये नाव असलेल्या विद्यार्थी-विद्यार्थिनी करिता)

**नोट : इतर राज्यातील विद्यार्थ्यांनी त्यांच्या जिल्हास्तरीय शिष्यवृत्तीसंबंधीत कार्यालयाशी संपर्क करावा.**

**शासनाच्या विविध शिष्यवृत्तीचा लाभ घेण्यासाठी खालील सूचनांचे पालन करावे.**

०१. मोबाईल नंबर व बँक खाते (Active) चालू असले पाहिजे.

०२. आपल्या आधारनंबरशी आपला मोबाईल नंबर लिंक असला पाहिजे.

०३. आपल्या बँक खात्याशी आपला आधार नंबर लिंक असला पाहिजे.

०४. विद्यार्थ्यांनी आधार क्रमांक स्वत:च्या (Bank Account) बँक खात्याशी संलग्न आहे का नाही हे (Aadhar Linking Status) पाहण्यासाठी सदरील लिंक पाहावी.http://resident.uidai.gov.in/bank-mapper

०५. विद्यार्थ्यांची किमान उपस्थिती ७५ टक्के असणे बंधनकारक आहे.

### आवश्यक कागदपत्रे

०६. महाविद्यालयाचे Bonafide Certificate (मूळ)

०७. तहसील कडून दिला जाणारा उत्पन्नाचा दाखला (सन २०२५-२६ चे) छायांकित प्रत

०८. पालकाचे Form No. १६ (सन २०२५-२६ चे)

०९. गुणपत्रिका १० वी ते आजतागायत (छायांकित प्रत)

१०. शाळा सोडल्याच्या दाखला (छायांकित प्रत)

११. जातीचा दाखला छायांकित प्रत (मागासवर्गीय शिष्यवृत्तीधारकांसाठी)

१२. स्वयंघोषित प्रतिज्ञापत्र (मागासवर्गीय शिष्यवृत्तीधारकांसाठी)

१३. रहिवासी प्रमाणपत्र (तहसीलचे) (छायांकित प्रत)

१४. विनाअनुदानित अभ्यासक्रमास Non - Creamy Layer तहसीलच्या प्रमाणपत्राची छायांकित प्रत (SC/ST व्यतिरिक्त)

१५. वडिल हयात नसल्यास त्यासंबंधीचे प्रमाणपत्र (छायांकित प्रत)

१६. आधारकार्ड (छायांकित प्रत) १७. शिष्यवृत्तीस खंड असल्यास शपथपत्र (मूळ)

१८. बँक पासबुक चे पहिले पेज (छायांकित प्रत)

१९. शासकीय वसतिगृह प्रमाणपत्र (मागासवर्गीय शिष्यवृत्तीधारकांसाठी)

२०. पालकांचे अल्पभूधारक शेतकरी / नोंदणीकृत मजूर असले बाबतचे प्रमाणपत्र (तहसीलचे) छायांकित प्रत आणि खाजगी घरभाडे शपथपत्र (डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह योजनेसाठी)

२१. पतीच्या उत्पनाचे प्रमाणपत्र (अर्जदार विवाहित स्त्री असल्यास)

२२. Self Declaration Minority Certificate पालकांचे सन सन २०२५-२६ चे वार्षिक उत्पन्न स्वयंघोषित घोषणापत्र (अल्पसंख्यांक शिष्यवृत्तीधारकांसाठी)

नोट : अनुक्रमांक ७ ते २१ पर्यंतचे सर्व कागदपत्रे स्पष्ट दिसतील असे Softcopy size 15 KB to 250 KB मध्ये Scan करून घ्यावे. जेणेकरुन आपणास शासनाच्या विविध शिष्यवृत्तीचे Online अर्ज भरतेवेळेस अडचण येणार नाही.

शासकीय शिष्यवृत्तीकरीता www.scholarship.gov.in / www.mahadbtmahait.gov.in व खाजगी शिष्यवृत्तीकरीता www.buddy4study.com हे संकेतस्थळ पहावे.

नोट : अधिक माहितीकरिता महाविद्यालयातील शिष्यवृत्ती विभागातील कर्मचारी श्री जयदीप टोंपे यांच्याशी संपर्क साधावा.

## विद्यार्थ्यांसाठी नियम व अटी

### अ. उपस्थिती व रॅगिंग प्रतिबंध

१. प्रत्येक नियमित व जादा तासाला विद्यार्थ्यांनी उपस्थित राहणे आवश्यक आहे.

२. विद्यार्थ्यांची प्रत्येक विषयाची किमान ७५% उपस्थिती असणे अनिवार्य आहे. यापेक्षा कमी उपस्थिती असल्यास त्यांना देण्यात येणाऱ्या शैक्षणिक सवलती रद्द केल्या जातील व विद्यापीठ परीक्षेला बसता येणार नाही.

३. महाराष्ट्र शासन रॅगिंग प्रतिबंध कायदा १९९९ व यूजीसी रॅगिंग प्रतिबंधक अधिनियम २००३ या नुसार रॅगिंग करणे दखलपात्र गुन्हा आहे. दोषीविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल. तसेच यू. जी. सी. अधिनियमानुार प्रवेश घेते वेळी प्रत्येक विद्यार्थ्याने संबंधित हमीपत्र भरुन देणे अनिवार्य आहे. तसेच www.antirangging.in या संकेतस्थळावर जाऊन Anti-ragging Undertaking चा फॉर्म भरून घ्यावा व Reference Number प्रवेश फार्मवर लिहावा अन्यथा प्रवेश निश्चित होणार नाही. संकेतस्थळावर भरलेला फॉर्म महाविद्यालयाच्या principalmumu@gmail.com या ईमेल आयडी वर फॉरवर्ड करावा.

४. सर्वोच्च न्यायालयाच्या विशाखा खटला या मार्गदर्शक सूचनेनुसार महिला अत्याचार व अॅट्रासिटी हे दंडनीय दखलपात्र गुन्हे आहेत.

५. महाविद्यालय परिसरात व महाविद्यालयाने आयोजित केलेल्या विविध उपक्रमात (शैक्षणिक कार्यक्रम, सहली) प्रशासनाने वेळोवेळी दिलेल्या शिस्तीसंबंधी सूचनांचे पालन करणे सर्व विद्यार्थ्यांस बंधनकारक राहील.

### ब. शिस्तीसंबंधी सूचना

१. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात वावरताना सोबत ओळखपत्र बाळगणे व नेमून दिलेला गणवेश परिधान करणे आवश्यक आहे.

२. प्रत्येक विद्यार्थ्यांने वर्गात व महाविद्यालयाच्या परिसरात शिस्त पाळणे आवश्यक आहे.

३. वर्गात असताना मोबाईलचा वापर करता येणार नाही.

### क. खालील कृत्यांचा शिस्तभंगात समावेश होतो.

१. गटबाजी करणे. २. गोंधळ करणे ३. सामुहिक सुट्टी, भांडण करणे

४. विद्यार्थिनीची छेड काढणे.

५. प्राध्यापक व कर्मचाऱ्यांशी उद्धट वर्तन करणे.

६. महाविद्यालयाच्या भिंत, डेस्क, फलक इत्यादींवर असभ्य मजकुर लिहणे व चिन्हे काढणे.

७. महाविद्यालय परिसरात तंबाखू खाणे, थुंकणे, धुम्रपान करणे.

८. वर्ग चालू असताना महाविद्यालय परिसरात रेंगाळणे.

९. प्राणघातक शस्त्र, स्फोटक पदार्थ शरीराला अपायकारक असणाऱ्या वस्तु किंवा विषारी पदार्थ इत्यादी बाळगणे.

वरील प्रकारची व इतर आक्षेपार्ह वर्तणूक आढळून आल्यास संबंधीत विद्यार्थ्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल व महाविद्यालयातून काढून टाकण्यात येईल

### ड. ग्रंथालयासंबंधी नियम :

१. ग्रंथालयात प्रवेश केल्यानंतर उपस्थिती नोंदवहीत आपल्या उपस्थितीची नोंद करावी.

२. इतर वाचकांच्या नावावर पुस्तके मिळणार नाहीत.

३. पुस्तक हरवणे, गहाळ होणे अथवा फाटल्यास त्या पुस्तकाची चालू आवृत्ती अथवा दुप्पट रक्कम भरावी लागेल.

४. ग्रंथालयात मोबाईल वापरता येणार नाही.

५. आपल्याला मिळालेली पुस्तके व्यवस्थित तपासून घ्यावीत. त्यातील पाने गळाल्यास, फाटल्यास ग्रंथालय कर्मचाऱ्यांना माहिती द्यावी.

६. आपण घेतलेले पुस्तक त्याच दिवशी परत करता येणार नाही.

७. ग्रंथालय परिसरात शांतता आणि शिस्त या दोन्ही बाबींचे पालन करावे.

८. संदर्भग्रंथ आणि चालू महिन्याचे मासिक आपल्याला घरी मिळणार नाहीत.

९. ग्रंथालय नियमात वेळोवेळी झालेल्या बदलास आपण बांधील असाल.

१०. ग्रंथालयात ओळखपत्र बाळगणे आवश्यक आहे.

# विद्यार्थ्यांसाठी राबविले जाणारे उपक्रम / योजना

## १. विद्यार्थी कल्याण मंडळ (Student Welfare Council)

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा २०१६ नुसार २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी विद्यार्थी कल्याण मंडळाची स्थापना केली जाईल. विद्यार्थी संसदेच्या नियुक्त सचिवाची विद्यापीठ प्रतिनिधी म्हणून निवड केली जाईल. विद्यार्थी कल्याण मंडळ समिती खालील प्रमाणे असेल.

| | |
|---|---|
| १. प्राचार्य | - अध्यक्ष |
| २. एक नियुक्त प्रभारी प्राध्यापक | - सदस्य |
| ३. प्राध्यापक, राष्ट्रीय सेवा योजना | - सदस्य |
| ४. प्राध्यापक, राष्ट्रीय छात्र सेना | - सदस्य |
| ५. प्राध्यापक, क्रीडा विभाग | - सदस्य |

## २.राष्ट्रीय सेवा योजना (विद्यार्थी / विद्यार्थिनींसाठी) NSS (Boys & Girls)

वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव, श्रम प्रतिष्ठा व कलागुणांच्या विकासासाठी राष्ट्रीय सेवा योजने तर्फे विद्यार्थी / विद्यार्थिनींसाठी रक्तदान, श्रमदान, कलापथक, नैसर्गिक आपत्तीमध्ये आपदग्रस्तांना मदत, आरोग्य तपासणी, अंधश्रद्धा निर्मूलन इ. उपक्रम राबविले जातात. प्रतिवर्षी ग्रामीण भागात दहा दिवसाचे युवक शिबीर आयोजित करण्यात येते, हे शिबीर साधारणत: दिवाळी सुट्टीत घेतले जाते. राष्ट्रीय सेवा योजनेची दोन वर्षे पूर्ण केलेल्या विद्यार्थी / विद्यार्थिनींना प्रमाणपत्र देण्यात येते.

## ३.राष्ट्रीय छात्र सेना (NCC)

i) राष्ट्रीय छात्र सेनेच्या राष्ट्रीय व इतर पातळीवरील कॅम्प्स मधून सहभाग घेण्याची संधी.
